| महापारेषण<br>महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित | **जमीन खरेदीसाठी नोटीस** |
|---|---|

.महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित अंतर्गत नवीन ४०० केव्ही उपकेंद्रासाठी खाजगी मालकी हक्काची अंदाजे ४५० X ४५० चौरस मीटर मापाची, अंदाजीत ४० ते ५० एकर जडवाहतूक होण्यायोग्य रस्त्यालगत जमीनीची आवश्यकता आहे. उपरोक्त जमीन पुसागोंडी, इसापूर, निर्वा, अकोला, अप्तुर, तर्ण, पव्नी, उमरेड, नवेगाव, घोटुर्ली, उदास, बोपश्वर, कान्हवा, पांढराबोडी, बुधवारी पेठ, सिरोली, वेलसाकरा ता. उमरेड, जि. नागपूर गावांच्या परिसरात व हतकवाडा (रि.) कोटगाव पासून १० कि.मी. त्रिज्येत असणे आवश्यक आहे.

वरील वर्णनाची जमीन विक्री करणाऱ्या इच्छुक जमीन धारकांनी किंवा २ किंवा अधिक एकत्रित जमीन धारकांनी तसेच प्रतिनिधींनी शेतकऱ्यांच्या मुखत्यार पत्रासह संबंधित कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतिसह स्वारस्य अर्ज नामनिर्देशित कार्यालयास सादर करावे.

१. अद्यावत ७/१२ उतारा.
२. खसरा नकाशा गाव नकाशासहित.
३. गाव नमुना ८ अ.
४. पोच नकाशा (लोकेशन मॅप).
५. जमीन धारकाने धारण केलेल्या जमिनीचा एकुण क्षेत्रफळ दर्शविणारा नकाशा.
६. जमिनीची लांबी, रुंदी व एकुण क्षेत्रफळ दर्शविणारा नकाशा.
७. जमीन जर कोणत्याही प्रकल्पात किंवा इतर कारणास्तव आरक्षित असल्यास जिल्हाधिकारी ह्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र किंवा जिल्हाधिकारी परवानगीसाठी कार्यालयात दाखल केलेल्या सेतु मार्फत अर्जाची प्रत अथवा पुरावा.
८. जमिनीचा एकरी दर.

वरील १ ते ८ प्रमाणे कागदपत्रे जोडून आपले स्वारस्य अर्ज मोहरबंद लिफाफ्यामध्ये दिनांक १७.०७.२०२५ पर्यंत (कार्यालयीन वेळेपर्यंत) कार्यकारी अभियंता (स्थापत्य) ह्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहचतील अशा बेताने पाठवावे किंवा प्रत्यक्ष भेटून द्यावेत. टपाल दिरंगाई इत्यादी कारणांमुळे उशीरा प्राप्त होणारे स्वारस्य अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. कारण न देता कोणत्याही किंवा सर्व अर्ज नाकारण्यात येण्याचा हक्क हस्ताक्षर कर्त्या अधिकाऱ्यांनी राखून ठेवला आहे.

**(सतिश अणे)**
**मुख्य अभियंता**
**अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ, नागपूर**

**पत्ता :-**
कार्यकारी अभियंता (स्थापत्य)
अउदा स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था विभाग,
महापारेषण, नागपूर,
प्रशायकीय इमारत
१३२ केव्ही उपकेंद्र मानकापूर सबस्टेशन परिसर,
कुणाल हॉस्पीटल छिंदवाडा रोड, मानकापूर,
नागपूर-४४००३०.
दुरध्वनी क्र. ८५५४९९६५६६, ८५५४९९३९३३